N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस ठाणे निजामपूरा * भिवंडी *

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** निजामपूरा **Year (वर्ष):** 2024

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0005

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/01/2024 23:40

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 03/01/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/01/2024
   **Time From (वेळेपासून):** 13:04 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/01/2024 **Time (वेळ):** 20:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 041
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/01/2024 23:20 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** **Beat No. (बिट क्र.):**
उत्तर, 1 किमी

**(b) Address (पत्ता):** महानगरपालिका येथील 06 ,व्या मजल्यावर लिफ्ट समोरील, सुवर्णजयंती विभागाच्या शेजारील,मोकळया रुम मध्ये मनपा भिवंडी

**(c)In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a)Name (नाव):** फहद अंजुम अब्दुलकलाम शेख

**(b)Father's Name (वडील चे नाव) :** अब्दुलकलाम

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रूम नं 731, दुसरा मजला, दस्तगीर अपार्टमेंट, साहिल , हॉटेल जवळ, न्यु गौरीपाडा, ,भिवंडी,निजामपूरा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रूम नं 731, दुसरा मजला, दस्तगीर अपार्टमेंट, साहिल , हॉटेल जवळ, न्यु गौरीपाडा, ,भिवंडी,निजामपूरा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फ़नाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री किशोर शिवराम केणे | | | 1. करमुल्यांकन विभाग, भिवंडी , निजामपुरा, महानगरपालिका,, भिवंडी जि ठाणे,निजामपूरा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री सुदाम नारायण जाधव | | | 1. करमुल्यांकन विभाग, भिवंडी, निजामपुरा, महानगरपालिका, , भिवंडी,निजामपूरा,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | श्रीमती सायराबानो रफीउज्जमा अन्सारी | | 1. करमुल्यांकन विभाग, भिवंडी , निजामपुरा, महानगरपालिका,, भिवंडी जि ठाणे,निजामपूरा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रू.1,50,000/ लाचेची रक्कम | 150,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

150,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

गु.र.नं 05/2023 भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन 1988 (संशोधन सन 2018 ) चे कलम 7,7(अ) , 12 प्रमाणे

मी फहद अंजुम अब्दुलकलाम ख, वय- 40 वर्षे , व्यवसाय- बांधकाम व्यवसायीक, राहणार रूम नं. 731, दुसरा मजला, दस्तगीर अपार्टमेंट, साहिल हॉटेल जवळ, न्यु गौरीपाडा, भिवंडी, जि. ठाणे समक्ष फिर्यादी जबाब लिहुन देतो की, मो.नं. 9322092197

मी वरील प्रमाणे असुन नमुद पत्त्यावर सन 1998 पासून माझे कुटूंबियांसह राहण्यास आहे. माझा कॅपिटल कंस्ट्रक्शन या नावाने भिवंडी येथे बांधकामाचा व्यवसाय आहे. तसेच मी भिवंडी महानगर पालिका कार्यक्षेत्रात बांधकाम संदर्भातील लायझनिंगची कामे देखील करीत आहे.

माझे परिचयाचे श्री अलकाब हूसैन शहाबुल्लाह अन्सारी, रा. घर नं. 229, सोगरा मंजील, नागांव रोड सलामतपुरा, भिवंडी, ठाणे यांनी घर नं. 419, नागांव क्र. 2 भिवंडी, ठाणे ही मालमत्ता सदर मिळकतीचे मुळ मालक क्र. 1) आसेफा बानो जमीन अन्सारी, 2) मुशीर अहमद कुरबान अली अन्सारी, 3) फरीदा शकील अहमद अन्सारी यांच्या कडून विकसीत करण्यासाठी सन 2023 मध्ये घेतली होती. त्याअनुशंगाने सदर मुळ मिळकत पाडून तेथे आर.सी.सी. तळमजला अधिक चार मजली इमारत बनविली आहे. परंतु सदरबाबत संबंधीत महानगरपालिकाकडून नव्याने सुधारीत कर आकारणी करून घेण्याकरीता त्यांनी कर मुल्यांकन विभागाकडे दिनांक 12/12/2023 रोजी लेखी अर्ज केला होता. परंतु श्री अलकाब अन्सारी यांच्या दैनंदिन व्यस्त व्यवसायामुळे त्यांना वरील प्रमाणे दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने भिवंडी महानगरपालिका अंतर्गत कर मुल्यांकन विभाग येथे पाठपुरावा करता येत नव्हता. सदर कामाचा पाठपुरावा करण्याकरीता श्री अलकाब अन्सारी यांनी मला दिनांक 13/12/2023 रोजी रू. 100/- मुल्याचे स्टॅम्प पेपरवर कामाचे अधिकार दिले आहेत.

त्यानंतर मी दिनांक 15/12/2023 रोजी नमुद मालमत्तेच्या कर आकारणी कामाचे पाठपुरावा करण्याकरीता भिवंडी महानगरपालिका करमुल्यांकन विभागातील क्लार्क श्री केणे यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. केणे यांनी मला वरील मालमत्तेच्या कर आकारणी नोंदणीच्या अनुशंगाने मालमत्तेच्या क्षेत्रफळाबाबत विचारणा केली असता, मी त्यांना सदरची मिळकत ही एकूण 13800/- स्क्वे.फु. क्षेत्रफळाची असल्याचे सांगितले. त्यावर श्री. केणे यांनी साईड व्हिजीट करून पुढील कार्यवाही करतो असे सांगितले. तसेच मिळकत अधिकृत करण्यासाठी प्रति स्क्वेअर फुट रू. 15/- याप्रमाणे रु. 2,07,000/- एवढी रक्कम होत असून त्याप्रमाणे दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी सदरची रक्कम महानगरपालिकेमध्ये भरणा करावी लागेल अगर कसे? याबाबत मी श्री. केणे यांच्याकडे



Scanned with CamScanner

विचारणा केली असता, श्री. केणे यांनी सदरची रक्कम रोखीने त्यांना दयावे लागतील असे मला सांगितले. त्यावेळी सदरची रक्कम ही शासकीय फी नसल्याचे मला समजले. त्यामुळे मी सदरची काम करण्याचे अधिकार असलेले कर मुल्यांकन विभागाचे प्रमुख श्री. सुदाम जाधव यांची भेट घेण्याकरीता कर मुल्यांकन विभागात गेलो असता, सदर कार्यालयात उपस्थित असलेल्या सायरा मॅडम यांनी मला बोलावुन माझेकडे कामाबाबत चैकषी केली. त्यावेळी मी त्यांना वरीलप्रमाणे श्री. केणे यांचेषी झालेले बोलणे सांगीतले. त्यावेळी सायरा मॅडम यांनी " मला काम दया, मी जाधव साहेबांच्या मार्फतीने रू. 12/- स्क्वेअर फुट प्रमाणे काम करून देते" असे सांगीतले.
त्यानंतर मी कर मुल्यांकन विभागाचे प्रमुख श्री. सुदाम जाधव यांची समक्ष भेट घेवुन त्यांना श्री. केणे व सायरा मॅडम यांच्याशी झालेल्या संभाशणाबाबत माहिती घेवुन कामाच्या अनुषंगाने विचारणा केली असता श्री. सुदाम जाधव यांनी श्री. केणे यांना माझे समक्ष " त्यांचे काय असेल ते कमी जास्त करून घ्या व फाईल लवकर पुटअप करा " असे सांगितले. त्यामुळे श्री. सुदाम जाधव हे श्री. केणे यांच्यामार्फत मिळकत नोंदणीकृत करण्यासाठी पैशाची मागणी करीत असल्याचे माझी खात्री झाली होती.

त्यानंतर मी दिनांक 18/12/2023 रोजी श्री. केणे, क्लार्क यांची त्यांचे कार्यालयात जावून भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना कामाच्या अनुषंगाने विचारणा केली असता, श्री. केणे, क्लार्क यांनी साईट व्हीजीट करावयाची असल्याचे सांगतले. परंतु त्यादिवशी देखिल त्यांनी साईट व्हिजीट केली नाही. त्यामुळे माझी खात्री झाली की, श्री. सुदाम जाधव यांनी श्री. केणे यांचेमार्फत मिळकत अधिकृत करण्यासाठी मागणी केलेली लाचेची रक्कम दिल्या शिवाय ते मिळकत अधिकृत करणार नाहीत. त्यामुळे भिवंडी महानगरपालिका कर मुल्यांकन विभागाचे प्रमुख श्री. सुदाम जाधव यांनी श्री. केणे, क्लार्क यांचेमार्फत मागणी केलेली रक्कम ही लाच असून ती त्यांना दयायची माझी इच्छा नसल्याने भिवंडी महानगरपालिका कर मुल्यांकन विभागाचे प्रमुख श्री. सुदाम जाधव, क्लार्क श्री. केणे, व श्रीमती सायराबानो अन्सारी यांच्या विरूध्द कायदेशिर कारवाई होणेबाबत मी दिनांक 19/12/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून मराठीतुन टंकलिखीत केलेली तक्रार दिली होती. त्याअनुषंगाने त्याच दिवशी पुढील कारवाई करणेच्या अनुषंगाने पो.नि. संतोश पाटील यांनी मागणी केल्याप्रमाणे सी विभाग वाशी, महानगर पालिका कार्यालय ,नवी मुंबई कार्यालयाकडुन दोन पंच हजर झाले त्या उपस्थित दोन शासकीय पंचाशी पो.नि. संतोष पाटील यांनी ओळख करुन त्यांना तक्रारीची थोडक्यात हकीगत सांगितले.
त्यानंतर दिनांक 19/12/2023 रोजीचे पडताळणी दरम्यान मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डसह पंच क्र. 1 श्री. निलेश मसुरकर, यांचे समवेत 16.02 वा. ते. 16.25 वा. दरम्यान कर मुल्यांकन विभागाचे प्रमुख श्री. सुदाम जाधव व क्लार्क श्री. केणे यांना भिवंडी महानगरपालिका येथे भेटण्यासाठी गेलो. त्यावेळी  श्री केणे, क्लार्क हे मला भेटले. त्यावेळी मी, क्लार्क श्री केणे यांचेशी माझी त्यांचेशी कामाबाबत चर्चा होवुन काही रक्कम कमी करण्याकरीता विनंती केली असता, संभाषणा दरम्यान क्लार्क श्री केणे हे मला '' अरे...बीस रुपये भाव है तुमको मै कितना बोला था सोला बोला था ना... पंधरा दे दो चलो'' '' हा बस...पंधरा के निचे अगर नही है...'' " तो मै कल तुम्हको काम निकालके दे सकता हु.... क्युकी उससे कम मे किधर होने वाला नही है...'' असे बोलुन माझ्याकडे श्री अलकाब अन्सारी यांनी विकसीत केलेल्या घर नं. 419, नागांव क्र. 2 भिवंडी, ठाणे या मालमत्तेचे नव्याने सुधारीत कर आकारणी करून मिळकत अधिकृत करण्यासाठी प्रति स्क्वेअर फुट प्रमाणे रू. 15/- प्रमाणे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. सदरवेळी मी त्यांना लाचेची रक्कम कमी करण्याची विनंती केली असता, क्लार्क श्री. केणे यांनी मला दुस-या दिवशी दिनांक 20/12/2023 रोजी कार्यालयात येवून कर मुल्यांकन प्रमुख श्री. सुदाम जाधव यांची भेट घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्री. सुदाम जाधव यांची भेट घेवून त्यांच्याशी लाचेच्या रक्कमेबाबत बोलणी करून लाचेच्या रक्कमेच्या मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे पोनि संतोष पाटील यांनी मला व पंचाना सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड ध्वनीमुद्रीत करण्यात आलेला असुन दिनांक 19/12/2023 रोजीचा पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
दिनांक 20/12/2023 रोजी मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्र. 1 निलेश मसुरकर यांचे समवेत 16.38 वा. ते. 17.52 वाजे दरम्यान श्री सुदाम जाधव यांची त्यांचे केबीनमध्ये भेट घेतली. भेटीदरम्यान माझी त्यांचेसोबत माझे फाईल बाबत विचारणा केली त्यावेळी श्री सुदाम जाधव यांनी मला सदर मालमत्तेचे ठिकाणाबाबत तसेच आजुबाजुच्या घरांबाबत विचारणा करुन, मी त्यांना त्याबाबत माहिती सांगितली. त्यानंतर मी त्यांना माझे कामाच्या संदर्भात याअगोदर भेटलो होतो त्यावेळी श्री सुदाम जाधव हे बोलले की काम चालु आहे त्यावेळी मी " अभी मै क्या बोलता हु साहेब सुनो प्राईस का तो करवा दो वो बहोत ज्यादा बोलता है " असे बोललो असता, सुदाम जाधव हे मला " वो मेरेको मालूम है " असे बोलले. त्यानंतर श्री सुदाम जाधव यांना " सर थोडासा ये करा दो.... सर अँक्चुली क्या है.....आज बीस दिन हो गये....और कल मै मिलके गया केणे साहाब को...आप बीझी थे ...अभी सारा मॅडम ने मेरेको बारा बोलेथे अभी आप पंधरा बोल रहे है...ज्यादा हुआ सर..." असे बोललो. त्यानंतर मी,



Scanned with CamScanner

सुदाम जाधव यांना " सारा मॅडमसे बात हुई थी...... वो मेरे को बारा का ये बोली थी बारा रुपये स्क्वेअर फीट... अभी केणे साहब पंधरा बोले आपसे डायरेक्ट मिलूंगा तो कुछ फायदा हो जाएगा मेरेको बोले थे ...लेकीन ये तो उलटा जादा ही बढा दिया....." असे बोललो असता, सुदाम जाधव यांनी माझेकडे मालमत्तेच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना सर्व कागदपत्र जमा केली असल्याचे सांगितले. त्यावेळी मी " अभी क्या केणे साहाब ने कुछ क्लिअर जवाब दिया नही .... तो मै खूद कनफ्युज हो गया...तो मै सामने भी जवाब नही दे पा रहा हु.." " मैने आपको मील लेता हु....कुछ क्लिअर हो जायेगा..." असे बोलत क्लार्क श्री. केणे यांनी मागणी केलेल्या रक्कमेच्या अनुषंगाने बोललो असता, सुदाम जाधव यांनी मला " उनके पास है तो पैसा ले लो... " असे सांगितले. त्यानंतर मी सुदाम जाधव यांच्याकडे त्यांच्याकडे निश्चिम रक्कमेबाबत विचारणा केली असता, सुदाम जाधव यांनी मला " हा....नही दस फाईल है..... पैसा तो मै लेता ही नही भाई......लेकीन क्या है......ये लोग हैना...उनके हिसाब से क्या करते पता नही...मै तो खाली...साहीन के आलावा ताबडतोब होता है तो बोलो...." " लेकीन आपना काम है ना...क्लिअर आयेगा ना तो बोलता हू....कि भाई पेमेंट का काम अभी फटापट करके ले .. अभी काम....टाईम बढाने की जरूरत नही है.....इतना भी हमारा और अभी दो चार पेपर बाकी पडे है " असे सांगितले. त्यावर मी " बराबर.....तो क्या केणे साहाब से मिलू फिर...." अशी विचारणा केली असता, सुदाम जाधव यांनी मला " हा बस बस केणे साहाब से मिलो वो अभी थोडा व्हिजीट के लिए गया " असे बोलून क्लार्क केणे यांना भेटण्यास सांगितले. त्यानंतर सुदाम जाधव यांनी मला हस्तांतरण च्या फाईलबाबत सांगून " ओ लेके आओ.... बहोत मिलता है तुम्हारा खर्चा पाणी छुटता रहेगा.. अभी लोग है ना मेरी बात सुनो .... लोग तीन हजार लेता है ... साडेतीन लेता है.....आप खाली दो ही लेना " असे सांगितले. त्यानंतर मी सुदाम जाधव यांच्या केबिनमधून बाहेर आलो. कार्यालयातुन येत असताना मला गेटवर श्री केणी, क्लार्क हे भेटले. त्यांना मी श्री सुदाम जाधव यांची भेट झाली आहे असे सांगुन त्यावर श्री केणी, क्लार्क यांनी मला दिनांक 21/12/2023 रोजी साईट व्हिजीट करुन सव्र्हे केल्यानंतर फाईल करुन पाठवितो असे सांगितले असल्याचे निश्पन्न झाले आहे. वरीलप्रमाणे सदरचे संभाशण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड ध्वनीमुद्रीत करण्यात आलेला असुन दिनांक 20/12/2023 रोजीचा पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर दिनांक 21/12/2023 रोजी क्लार्क श्री. केणे यांची भेट घेण्याचे ठरविण्यात आले.

त्याप्रमाणे दिनांक 21/12/2023 रोजी करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीचे पडताळणी दरम्यान भिवंडी महानगरपालिका कर मुल्यांकन विभातील क्लार्क श्री. केणे हे साईट व्हिजीटसाठी अलकाब अन्सारी यांच्या इमारतीजवळ आले. त्यावेळी मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व पंच साक्षीदार यांच्यासह श्री. केणे यांना भेटलो. त्यावेळी श्री. केणे यांनी इमारतीमध्ये जावून प्रत्येक मजल्यावर असलेल्या फ्लॅटबाबत खात्री केली. त्यावेळी श्री. केणे यांनी "रुको सोमवार को मै तुमको ऑर्डर देगा लेकिन सोमवार को पैसा रेडी रखना.." असे मला सांगितले त्यावेळी मी " सोमवार को." अषी श्री. केणे यांच्याकडे खात्री केली असता, श्री. केणे यांनी मला " हा क्योकी तुरंत आपने को पहिला पैसा देणे का हा क्या " असे सांगितले. त्यावेळी मी श्री. केणे यांना " मेरको उसका एक राऊड फिगर लिखना है ना.. कितना बैठ रहा है मेरको भी... क्युं की उपर का जो आएगा ना मेरेको भी " असे बोलत त्यांनी मागणी केलेल्या प्रति स्क्वेअर फुट रक्कमेच्या अनुशंगाने निश्चित रक्कमेबाबत विचारणा केली. तसेच माझ्या मोबाईलचा कॅल्युलेट

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH GAUBA AVHAD(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

खात्री करून सदर केबिनमधून बाहेर आल्यानंतर मी माझे डाव्या हाताने उजव्या हाताचे शर्टची बाही वर करून श्री. केणे यांनी लाचेच्या रक्कमेचा स्विकार केला असल्याबाबत सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने किशोर केणे यांना १३:०४ वा. पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेसह रंगेहात ताब्यात घेतले आहे.

त्यानंतर आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द भिवंडी निजामपुर महानगर पालिका, भिवंडी येथील सहाव्या मजल्यावरील कर मुल्यांकन विभागात सापळा पंचनामा कारवाई पुर्ण करण्यात आला आहे.

तरी मला विकासक श्री. अलकाब अन्सारी यांचेकडून अधिकार पत्र प्राप्त असलेल्या विना परवाना विकसित केलेल्या बांधकामांचा मालमत्ता क्रमांक कायम करुन महानगरपालिकेडील प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी, जुनी कर आकारणी रद्द करुन नव्याने सुधारित करआकरणी लागु करण्यासाठी भिवंडी निजामपुर महानगर पालिका, भिवंडी येथील सहाव्या मजल्यावरील कर मुल्यांकन विभागातील लोकसेवक १) श्री किशोर शिवराम केणे, वय ५१ वर्षे, लिपीक (वर्ग-३), करमुल्याकंन विभाग व २) श्री सुदाम नारायण जाधव, वय ५४ वर्षे, वसुली निरीक्षक, विभाग प्रमुख कर मुल्याकंन ( अति.कार्यभार पर्यावरण अधिकारी ) (वर्ग - ३) यांनी प्रति.चौ. फुट रू. १५/- दराने एकूण १०,४०० चौ.फुटाचे एकूण रू. १,५६,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू. १,५०,०००/- लाचेची मागणी करून लोकसेवक श्री. सुदाम जाधव यांनी सदरची रक्कम स्विकारण्यास लोकसेवक श्री. किशोर केणे यांना प्रोत्साहन दिले, तसेच श्री केणे यांनी सुदाम जाधव यांचेकरीता देखील लाचेची मागणी केली. तसेच लोकसेविका श्रीमती सायराबानो अन्सारी यांनी लोकसेवक यांना सदर लाच मागणी व स्विकारणे करीता प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर दिनांक ०३/०१/२०२४ रोजी लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. केणे यांनी माझेकडून रू.१,५०,०००/- लाचेची रक्कम स्विकारली असता, श्री. केणे यांना सापळा पथकाकडून भिवंडी महानगरपालिका येथील ०६ व्या मजल्यावर लिफ्ट समोरील सुवर्णजयंती विभागाच्या शेजारील मोकळया रुम मध्ये पंच साक्षीदार यांचे समक्ष १३:०४ वा.रंगेहात ताब्यात घेतले आहे. म्हणून माझी १) श्री किशोर शिवराम केणे, वय ५१ वर्षे, अतिरीक्त कार्यभार लिपीक (वर्ग-४), करमुल्याकंन विभाग, २) श्री सुदाम नारायण जाधव, वय ५४ वर्षे, वसुली निरीक्षक, विभाग प्रमुख कर मुल्याकंन ( अति.कार्यभार पर्यावरण अधिकारी ) (वर्ग - ३) व ३) श्रीमती सायराबानो रफीउज्जमा अन्सारी वय ५२ वर्षे, लिपीक, तथा प्रभारी कार्यालयीन अधिक्षक, (वर्ग-३), सर्व नेमणुक करमुल्याकंन विभाग, भिवंडी निजामपुरा, महानगरपालिका, भिवंडी जि. ठाणे यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मराठीत माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मी वाचुन पाहीला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

हे लिहून दिले सही

(संतोष पाटील)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANTOSH GAUBA A\

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):



Scanned with CamScanner